**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७३/२०१९** **दिनांक ०९/०९/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०९/२०१९ ते ०९/०९/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/०९/२०१९ सकाळी ८:३० पासून १४/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/०९ | ०४/०९ | ०५/०९ | ०६/०९ | ०७/०९ | ०८/०९ | ०९/०९ | | १०/०९ | ११/०९ | १२/०९ | १३/०९ | १४/०९ |
| १०७.४ | ११३.४ | १६१.० | १०६.४ | ११९.० | ८७.६ | ७६.८ | पाऊस (मिमी) | ४९ | ११ | १० | १८ | २ |
| २८.२ | २५.५ | २५.८ | २५.१ | २६.२ | २६.८ | २७.६ | कमाल तापमान (अं.से) | २९ | २९ | ३० | २९ | २९ |
| २३.० | २३.२ | २२.५ | २३.५ | २३.० | २३.८ | २३.२ | किमान तापमान (अं.से) | २४ | २४ | २३ | २३ | २५ |
| ६ | ८ | ८ | ६ | ८ | ८ | ८ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ७ | ६ | ८ | ८ |
| १०० | १०० | १०० | ९८ | ९८ | ९८ | १०० | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९५ | ९५ | ९५ | ९५ | ८८ |
| ९३ | १०० | ९८ | ९२ | ९६ | ९३ | ९३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ९१ | ८३ | ७७ | ७८ | ७७ |
| २.८ | ४.३ | ३.२ | ११.८ | ७.० | ४.८ | ६.४ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | ६ | ६ | ५ | ५ |
| नै. | प. | नै. | प. | प. | प. | प. | वाऱ्याची दिशा | द. | द. | द. | द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ७७१.६ | ४६८८.७ | ३०७१.८ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ७ ते ११ सप्टेंबर,२०१९ पर्यंत हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक ६ ते १२ सप्टेंबर,२०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पोटरी ते फुलोरा अवस्था** | • भात पिक पोटरी अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• हळवे भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असल्याने नत्र खताची तिसरी मात्रा ४३ किलो युरिया प्रती हेक्टर या प्रमाणात पाऊसाचा अंदाज घेवून द्यावा.<br>• आर्द्रतेत होणाऱ्या वाढीमुळे पोटरी अवस्थेत असलेल्या निमगरव्या व गरव्या भात पिकावर आभासमय काजळी या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. या रोगामुळे भाताच्या लोंबीतील दाण्याचे रुपांतर काळसर हिरव्या रंगाच्या मखमली गाठीमध्ये होते. रोगाच्या नियंत्रणासाठी पिक पोटरी अवस्थेच्या शेवटच्या टप्प्यात असताना हेक्झाकोनाझोल ५ टक्के प्रवाही बुरशीनाशकाची १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • अति पाउसामुळे आर्द्रतेत वाढ संभवत असल्याने तसेच कमी सूर्यप्रकाश यामुळे फायटोप्थोरा रोगकारक बुरशीला पोषक वातावरण निर्माण होण्याची शक्यता असल्याने काजू झाडाची पाने पिवळी पडून पानगळ आणि फांद्याची मर दिसून येण्याची शक्यता असल्याने बुरशीच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने गोळा करून नष्ट करावीत, रोगट फांद्या कापून काढाव्यात कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावीत. अशा प्रकारे बागेची स्वच्छता केल्यावर मेटॅलक्झील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी. |
| **नारळ** | **-** | • पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा दुसरा हप्ता पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावा.<br>• नवीन लागवड केलेल्या रोपांवर अति पाऊसामुळे कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.<br>• जुन्या नारळ बागेत सुकलेल्या झावळ्या, वांझ पोयी, पालापाचोळा गोळा करून बागेत स्वच्छता करावी तसेच अति पाऊसामुळे कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता लक्षात घेता बागेचे निरिक्षण करून प्रादुर्भाव आढळयास शेंड्याकडील भागावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | **फलधारणा** | • वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडग्रस्त शेंडे व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

• **टीप: फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**